## नि.दि.मु.क्र. १३८/२०११ मधील नि.क्र. ६५ वरील आदेश

१. सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ मधील तरतूदीनुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, दावा परि.क्र. ५ मध्ये कै. भगवान गुणाजी राऊळ यांची वंशावळ दिलेली आहे. त्यामध्ये कै. रामचंद्र भगवान राऊळ यांच्या मुलांची नावे दिलेली आहेत. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ८ म्हणून 'अपू' असे नाव दिलेले आहे. परंतु टायपिंग मिस्टेकमुळे ती चूक झालेली आहे. प्रत्यक्षात तेथे 'अंकुश' असे नाव असणे आवश्यक आहे. दाव्यातील शिर्षकामधील प्रतिवादी सदरामध्ये प्रतिवादी क्र. ८ म्हणून अंकुश रामचंद्र राऊळ असेच नाव नमूद आहे. परंतु दाव्याच्या परि.क्र. ५ मधील वंशावळीमध्ये 'अपू' असे नाव टाईप झालेले आहे. तरी वंशावळीमधील 'अपू' या नावावर काट मारुन त्याजागी 'अंकुश' असे नाव लिहिण्याची परवानगी असावी.

३. वादीने पुढे असे कथन केले आहे की सदरची टायपिंग मिस्टेक झालेली आहे. त्यानंतर वादीने सदर अर्ज दाखल केलेला आहे. वादीने मुद्दामहून चालढकलपणा करण्यासाठी हा अर्ज दिलेला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ मधील परंतुकाची बाधा या दुरुस्तीस येणारी नाही. सदरचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. मात्र अर्ज फेटाळला गेल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न निघणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

४. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आक्षेप घेतला आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व खोडसाळ असून तो बेकायदेशीर आहे. वादीने सदरचा अर्ज सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्ल्यानंतर दिलेला आहे. वादीने सदरचा अर्ज दाव्याच्या चौकशीचे काम सुरु होण्यापुर्वी का दिला नाही याचे योग्य व संयुक्तीक कारण अर्जात नमूद केलेले नाही. वादीने योग्य ती काळजी घेवूनही सदरची दुरुस्ती दाव्याची चौकशी सुरु होण्यापुर्वी करु शकला नाही असे वादीच्या अर्जात नमूद नाही. त्या कारणे देखील वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपावर परिणाम होणारा आहे. 'अपू' ही 'अंकुश' होती असे

वादीच्या अर्जावरुन म्हणता येणार नाही. 'अपू' आणि 'अंकुश' या दोन वेगवेगळया व्यक्ती असल्याने 'अपू' च्या ऐवजी 'अंकुश' असे नाव लिहिता येणार नाही. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादींतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने सदरील दावा हा ठराव व दावा मिळकतीचे सरस निरस वाटप होवून पृथक व तुटक कब्जा मिळण्यासाठी प्रतिवादी यांच्या विरुध्द दाखल केलेला आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही टंकलेखनातील चुक आहे, हे सकृतदर्शनी निदर्शनात येते, कारण मुळ दाव्यात त्यांनी प्रतिवादी क्र. ८ चे नाव 'अंकुश' असे नमूद केले आहे. तसेच सदरची चुक ही तांत्रिक स्वरुपाची आहे. तांत्रीक बाबी या न्यायदानात अडथळा ठरता कामा नये ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पक्षकारांच्या चुका, निष्काळजीपणा हेतुतः नसेल तर त्यांना न्यायापासून वंचित ठेवता येणार नाही. वादीच्या प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या गुणदोषावर तसेच स्वरुपावर कोणताही परिणाम होणारा नाही. प्रतिवादींचे देखील काही नुकसान होणार नाही. सबब प्रतिवादींच्या दुरुस्ती अर्जास असलेल्या हरकती संयुक्तीक वाटत नाहीत. प्रतिवादींना देखील दुरुस्तीनंतर त्याची बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. याउलट, दोन्ही पक्षकारांचे वादाचे मुद्दे एकाच प्रकरणात लवकर निकाली काढण्यासाठी मदत होईल. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होईल. वादीने विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादीवर खर्च देवून न्यायाचा तराजू समतोल राखता येईल. वरील चर्चित कारणाअंती अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरेल. सबब मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ६५ वादीने रक्कम रु. २००/— खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी याने रक्कम रु. २००/— खर्चाची रक्कम विधी सेवा प्राधिकरणाकडे जमा करावी.

३. वादी यांनी योग्य मुदतीत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पटलावर दाखल करावी.

सही/—

६

दिनांक :— ०७/०३/२०१७ ( एस.एच.पन्हाळे )

ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.